सं.फौ.ख.क्र. ८७१/२०१९
सरकार वि. सादीक खान
नि.क्र.७ खाली

# आदेश

(पारीत दि.२९/०९/२०२०)

सदर प्रकरणात गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल देशी दारु नाश करण्याची परवाणगी मिळणेबाबत पोलीस स्टेशन अधिकारी, राजुरा यांनी जा.क्र.२२०३/२०२०, दि.०७.०९.२०२० प्रमाणे प्रस्तुत अर्ज दाखल केला. त्यांच्या म्हणण्यानुसार सदर जप्त मुद्देमाल पोलीस स्टेशनला प्रलंबीत असून सदरचा गुन्हा न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. जिल्ह्यात दारुबंदी असल्यामुळे गुन्ह्यात वाढ होत आहे व मुद्देमाल ठेवण्यास जागा अपुरी पडत असल्याने गुन्ह्यातील मुद्देमालाचा निपटारा करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल १४४ नग प्रत्येकी १८० मि.ली. देशी दारु (१ शिशी सी.ए. करीता मुकरर केली) नष्ट करण्याचा आदेश होण्यास विनंती केलेली आहे. विद्वान सरकारी अधिवक्त्यांनी योग्य तो आदेश पारीत करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

२. मा. सर्वोच्च न्यायालयाने सुंदरभाई अंबालाल देसाई आणि सी.एम. मुदलीया वि. -- स्टेट ऑफ गुजरात, ए.आय.आर. २००३ एस.सी. ६३८ मध्ये प्रतिपादीत केलेले न्यायतत्व येणेप्रमाणे आहे.

१९. For articles such as seized liquor also, prompt action should be taken in disposing it of after preparing necessary panchnama. If sample is required to be taken, sample may kept properly after sending it to the Chemical Analyzer, if required. But in no case, large quantity of liquor should be stored at the police station. No purpose is served by such storing.

३.		मा. सर्वोच्च न्यायालयाने प्रतिपादित केले आहे की, जप्त दारु या वस्तुची विल्हेवाट लावण्याकरीता आवश्यक तो पंचनामा तयार करुन त्वरीत कार्यवाही करावी. जर नमुन्याची आवश्यकता असेल तर नमुना व्यवस्थीतपणे रासायनिक प्रयोगशाळेत पाठविल्यानंतर ठेवावा. परंतु, कोणत्याही परिस्थितीत जास्त प्रमाणामध्ये दारु पोलीस स्टेशनमध्ये जमा ठेऊ नये आणि तशी दारु जमा ठेऊन कोणताही उद्देश सफल होत नाही.

४.		देशी दारु अथवा विदेशी दारु जमिनित पुरवू शकत नाही, कारण की, त्यामुळे जमिनिला तसेच इतरांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाने प्रतिपादीत केलेले न्यायतत्व पाहता तसेच जप्त मुद्देमाल ठेवण्याकरीता जागा अपुरी पडत असल्याचे कारण पाहता जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याबाबत आदेश पारीत करणे आवश्यक असल्याचे दिसून येते. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. नि.क्र.७ वरील अर्ज मंजुर करण्यात येते.

२. पोलीस स्टेशन राजुरा मधील गुन्हा क्र. ४७८/२०२०, मधील (सं.फौ.ख.क्र. ८७१/२०१९) मधील रासायनिक परिक्षणाकरीता काढलेल्या शिशी व्यतिरिक्त इतर देशी दारु प्रत्येकी १८० मि.ली. च्या शिशा अर्जात नमुद केल्याप्रमाणे निरिक्षक राज्य उत्पादक शुल्क, चंद्रपुर यांच्याकडे योग्य विल्हेवाट लावण्यासाठी पाठविण्यात यावे.

३. उपरोक्त कार्यवाही बाबत अहवाल न्यायालयात सादर करावा.

Digitally signed by Satish Gopalrao Gore
Date: 2020.09.30 12:12:37 +0530

(एस. जी. गोरे)

दिनांक :– २९.०९.२०२०		न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

राजुरा.